**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक १३ ऑक्टोबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **नागपूर जिल्हा परिषद सार्वत्रिक निवडणूक 2025 साठीची आरक्षण सोडत जाहीर; एकूण १८ विभाग अनुसूचित जाती आणि जमातींसाठी आरक्षित.**
2. **रेल्वे पोलीस दलातली पदं यापुढे कर्मचारी निवड आयोगाद्वारे भरण्यात येतील, अशी रेल्वे मंत्र्यांची घोषणा.**
3. **आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शक्य तिथे महायुती म्हणून लढणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे संकेत.**
4. **वेस्ट इंडिज विरुद्धच्या कसोटी क्रिकेट मालिकेत भारत विजयाच्या उंबरठ्यावर, जिंकण्यासाठी ५८ धावांची आवश्यकता.**

---------------------------------------------

आरक्षण सोडत

नागपूर जिल्हा परिषद सार्वत्रिक निवडणूक 2025 साठीची आरक्षण सोडत आज जाहीर करण्यात आली. आमच्या प्रतिनिधीने दिलेल्या माहितीनुसार, सावनेर तालुक्यातील चनकापूर आणि चिंचोली हे विभाग अनुसूचित जातींसाठी आरक्षित आहेत, तर पारशिवनी तालुक्यातील माऊली हा विभाग अनुसूचित जमातीसाठी आरक्षित करण्यात आला आहे. रामटेक तालुक्यातील वडांबा, बोथीया पालोरा, सोनेघाट आणि मनसर हे विभाग अनुसूचित जमातीसाठी राखीव आहेत. कुही तालुक्यातील वेलतुर आणि सिल्ली हे विभाग अनुसूचित जातींसाठी तर नागपूर ग्रामीण मधील दवलामेटी हा विभाग अनुसूचित जातीसाठी आरक्षित करण्यात आला आहे. काटोल तालुक्यातील येनवा आणि पारडसिंगा इथे देखील अनुसूचित जातींसाठी आरक्षण असेल. त्याचप्रमाणे हिंगणा तालुक्यातील इसासनी आणि टाकळघाट इथं अनुसूचित जाती तर सावंगी देवळी आणि कान्होली बारा इथं अनुसूचित जमातींसाठी आरक्षण देण्यात आलं आहे. उमरेड तालुक्यातील वायगाव हा विभाग अनुसूचित जातींसाठी तर भिवापूर तालुक्यातील नांद हा विभाग अनुसूचित जमातीसाठी आरक्षित करण्यात आला आहे. हे आरक्षण 2011 च्या जनगणनेनुसार देण्यात आलं आहे.

---------------------------------------------

निवड आयोगाद्वारे भर्ती

आरपीएफ अर्थात रेल्वे पोलीस दलातल्या पदांसाठी यापुढे कर्मचारी निवड आयोगाद्वारे भर्ती केली जाईल, अशी घोषणा रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली आहे. गुजरातमध्ये वलसाड इथे रेल्वे पोलीस दलाच्या एकेचाळीसाव्या स्थापना दिनानिमित्त आयोजित सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी त्यांनी आरपीएफशी संबंधित विविध उपक्रमांचा प्रारंभ केला. रेल्वे पोलीस कर्मचाऱ्यांकडे आता अतिउच्च फ्रिक्वेंसी असलेली उपकरणं दिली जातील, तसंच त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी त्यांना प्रगत डिजिटल आणि ड्रोन प्रशिक्षण दिलं जाईल,अशी घोषणाही रेल्वे मंत्र्यांनी यावेळी केली....

***(होल्ड बाईट - रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव 28 सेकंद)***

***जितना आपको चाहिए, उतने VHF लीजिये इसमें बहुत आपको बेनिफिट मिलेगा, जो NCRB के साथ मिलकर आप काम कर रहे हैं कि इसके इम्प्लिमेंटेशन के लिए जो डेटाबेस ऐप्लिकेशन से है, उसके लिए 14 करोड़ रुपीज की जरूरत है, वो भी आपके लिए सैंक्शन किया जाता है और सभी ट्रेनिंग संेटर्स में ऐडवान्स डिजिटल और ड्रोन की ट्रेनिंग इसके लिए भी 21 करोड़ की लागत से सभी जगह लैबोरेट्रीज की स्थापना की जाएगी।***

कमी उत्पन्न असलेल्या गटांच्या कल्याणासाठी रेल्वे सेवा वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चार यावेळी वैष्णव यांनी केला. येत्या दिवाळी आणि छट पूजेसाठी रेल्वे १२ हजार विशेष गाड्या चालवणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

---

बिल्डेथॉन २०२५

विकसित राष्ट्र बनण्यासाठी भारताला स्पष्ट दृष्टिकोन, प्रगत तंत्रज्ञान आणि आयटी-चालित उपायांची आवश्यकता असून, येत्या काळात विद्यार्थी हे उपाय तयार करतील, असा विश्वास केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी व्यक्त केला. देशात शालेय स्तरावरील हॅकेथॉन स्पर्धा, विकसित भारत बिल्डेथॉन २०२५ चं उद्घाटन करताना ते आज बोलत होते.

***(होल्ड बाईट - केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान 22 सेकंद)***

***ना केवल भारत की ही आवश्यकता को आप लोग पूरा करोगे, दुनिया की आवश्यकता को दुनिया की रिक्वायरमेंट को यू ऑल आर गोइंग टु क्रियेट न्यू हिस्टरी न्यू मॉडल ये आपसे अपेक्षाएं वी आर ऑल मोस्ट थैंकफुल टु प्राइम मिनिस्टर नरेंद्र***

***मोदी इन विज़न इन न्यू मॉडल अटल इनोवेशन मिशन थ्रू दिस हैकाथॉन मेगा स्कूल इनोवेशन इवेंट आज हम आयोजन किए हैं।***

तीन लाखांहून अधिक शाळा आणि २५ लाखांहून अधिक विद्यार्थी आणि शिक्षकांनी या बिल्डेथॉनमध्ये व्हर्च्युअल पद्धतीने भाग घेतला आहे. शिक्षण मंत्रालयाने अटल इनोव्हेशन मिशन आणि नीती आयोगाच्या सहकार्याने आयोजित केलेल्या या देशव्यापी उपक्रमात ,इयत्ता ६ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांना त्यांची सर्जनशीलता आणि समस्या सोडवण्याचे कौशल्य दाखवण्यासाठी आमंत्रित केलं आहे. यावर्षीची स्पर्धा आत्मनिर्भर भारत, स्वदेशी, व्होकल फॉर लोकल आणि समृद्ध भारत या चार संकल्पनांवर आधारित आहे. या स्पर्धेतल्या, राष्ट्रीय स्तरावरील दहा, राज्यस्तरावरील १०० आणि जिल्हास्तरावरील एक हजार विजेत्यांना एकंदर एक कोटी रुपयांची पारितोषिकं वितरीत करण्यात येतील.

---------------------------------------------

मनसे

महाविकास आघाडीत मनसेला सामावून घ्यायला काँग्रेसनं विरोध केला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, आज मुंबईत काँग्रेस पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. त्यात मुंबई महापालिकेची निवडणूक एकट्यानं लढवण्याची मागणी नेत्यांनी एकमतानं केली. कुठल्याही जागेवर मैत्रीपूर्ण लढत करण्याचा काँग्रेसचा विचार नसल्याचं ,मुंबई प्रदेशाध्यक्ष वर्षा गायकवाड यांनी या बैठकीनंतर वार्ताहरांना सांगितलं. मनसेच्या युतीसंदर्भात पक्ष श्रेष्ठींना भूमिका कळवणार असल्याचं काँग्रेस नेत्यांनी सांगितलं.

---------------------------------------------

(एससी) उपवर्गीकरणाचा प्रस्ताव

राज्यात अनुसूचित जातींमध्ये (एससी) उपवर्गीकरणाचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात असून, लवकरच त्याची अंमलबजावणी केली जाईल, अशी माहिती सरकारने दिली आहे. मात्र वर्गीकरणाच्या प्रक्रियेवर ,बहुजन समाज पक्षाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. वर्गीकरणामुळे सामाजिक एकतेला तडे जाऊ शकतात, अशी चिंता पक्षाचे प्रदेश महासचिव,पश्चिम महाराष्ट्र झोन मुख्य प्रभारी डॉ.हुलगेश चलवादी यांनी व्यक्त केली. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात ,एससी गटातील प्रगत समाजांमुळे मागे पडलेल्यांना न्याय मिळावा ,यासाठी उपवर्गीकरणाचा विचार करता येईल, असा निर्वाळा दिला होता. मात्र, या निर्णयाचा संदर्भ घेऊन संपूर्ण एससी गटाचे विभाजन

करणे, हे केवळ तात्कालिक राजकीय फायदे साधण्यासाठी होत असल्याचा दावा डॉ.चलवादी यांनी पत्रकाद्वारे केला आहे.

-----------------------------------------------

मुख्यमंत्री

आगामी महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती यांच्या निवडणुकांच्या दृष्टीने आढावा घेण्यासाठी भाजप अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी संपूर्ण महाराष्ट्रात विभागवार दौरे लावले आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज अमरावती इथं दिली. आज अमरावती विभागाचा आढावा घेण्यासाठी आले असता त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. आज संध्याकाळी नागपूर विभागाची बैठक होणार असल्याची माहिती त्यांनी दिली. दरम्यान, शक्य तिथे युती म्हणूनच लढणार असल्याचे संकेत देताना स्थानिक पातळीवर देखील त्याबाबत अधिकार दिले असल्याचं ते म्हणाले -

***(होल्ड बाइट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस 19 सेकंद)***

***युतीच्या संदर्भातही आम्ही जे काही अधिकार आहेत ते खाली देतो आहोत पण साधारणपणे जिथे जिथे शक्य तिथे युती केली पाहिजे अशा प्रकारचे निर्देश दिलेले आहेत आणि एखाद्या ठिकाणी युती झाली नाही तरी मित्रपक्षावर टीका करू नये अशा प्रकारचे निर्देश हे त्या ठिकाणी दिलेले आहेत. मला असे वाटते की महायुती म्हणून या निवडणुकीमध्ये चांगल यश हे आमच्या तिन्ही पक्षांना मिळेल.***

-----------------------------------------------

ऑक्टेव्ह समारोप

ईशान्य भारतातील आठही राज्ये महत्त्वपूर्ण असून त्यांची भाषा, संस्कृती निराळी असली, तरी 'भाषा अनेक फिर भी हमारा देश एक' या न्यायाने एकतेचा संदेश ईशान्यवासीयांनी दिला असल्याचं प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी नागपुरात केलं. केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र उदयपूर आणि दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 4 दिवसीय 'नॉर्थ इस्ट ऑक्टेव्ह' महोत्सवाचा काल समारोप झाला, त्यावेळी ते बोलत होते.

-----------------------------------------------

कसोटी क्रिकेट

नवी दिल्लीतील अरुण जेटली मैदानावर सुरु असलेल्या भारत आणि वेस्ट इंडीज कसोटी क्रिकेट सामन्यात भारत विजयाच्या उंबरठ्यावर आहे. दुसऱ्या कसोटी क्रिकेट

सामन्यात, आज चौथ्या दिवशी, फॉलोऑननंतर वेस्ट इंडिजन पहिल्या डावातील पिछाडी भरून काढली. मात्र भारताने त्याचे सर्व गडी बाद करत वेस्ट इंडिजला ३९० धावांवर रोखले. त्यामुळे दिवसाअखेर ,भारतासमोर विजयासाठी १२१ धावांचे लक्ष होते. आजचा खेळ संपला तेव्हा भारतीय संघानं एक गडी गमावून ६३ धावा केल्या आहेत. उद्या शेवटच्या दिवशी भारताला जिंकण्यासाठी केवळ ५८ धावांची गरज आहे. या विजयानंतर भारत ही कसोटी मालिका २-० ने जिंकेल.

------------------------------------------------

हवामान

नैऋत्य मौसमी पावसानं राज्यातून पूर्णपणे माघार घेतली असल्याचं हवामान विभागानंजाहीर केलंय. राज्यातलामान्सूनचा माघारीचा प्रवास आज पूर्ण झाला. आता केवळ दक्षिण भारतआणि ओडिशातून मान्सूनची माघार शिल्लक आहे. राज्यात येत्या १५ ते १८ ऑक्टोबर दरम्यान विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात वातावरणढगाळ राहील, आणि दुपार नंतर वादळी पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

------------------------------------------------